# “ ज्ञानाची शेती ”

## “ विषमुक्त (Residue free) गाजर लागवड तंत्रज्ञान ”

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

भारतात गाजर या पिकाची उत्तरेकडील राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आपल्याकडे शेती केली जाते पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल, राजस्थान मध्ये गाजर पिकांचे मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. गाजराचा वापर भाजी, कोशिंबीर, सलाड, कँडी, मुरंबा, लोणचे व “ माँ ने अपने हांथो से बनाया गाजर का हलवा ” तर आपणास माहित आहेच, इत्यादीसाठी होत असतो. कोरोना नंतर आपल्याकडे आरोग्य बद्दलची जागरूकता वरचे वर वाढत असून जीवनशैलीचे आजार वाढत असल्याने सॅलड वर्गीय पिकाची मागणी वाढत आहे. त्यामुळे ह्या पिकाखालील क्षेत्र ही वाढत आहे.



गाजर हे अल्प कालावधीचे कंदवर्गीय पिक असून यातून जीवनसत्व “अ”, “ब”, आणि “क” मिळतात. तसेच तांबे, लोह, पोटॅशियम आणि फॉस्फरस सारखी खनिजे भरपूर प्रमाणात मिळतात. गाजरामध्ये फायबरचे प्रमाण भरपूर असल्याने पचनसंस्थेचे आजार, हृदयरोग, वजन कमी करण्यासाठी तसेच गाजरामध्ये मोठ्या प्रमाणात अँटी ऑक्सिडंट व जीवनसत्व “क” असल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास याच्या सेवनाने मदत तर होतेच त्याचबरोबर कर्करोगासारख्या दुर्धर आजारास ते दूर ठेवू शकते आणि यामध्ये जिवनसत्व “अ” प्रमाण भरपूर असल्याने डोळ्यांचे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. अशा या बहुगुणी, अल्प कालावधीच्या, कच्चा स्वरूपात सेवन केले जाणाऱ्या महत्वाच्या कंद वर्गीय पिकाचे उत्पादन तेही विषमुक्त (Residue Free) घेण्यास अनन्यसाधारण महत्व आहे त्यासाठी ज्ञानाच्या शेतीचा हा छोटासा प्रयत्न.

### हवामान व लागवडीचा हंगाम

गाजर हे थंड हवामानात वाढणारे पीक आहे त्यामुळे या पिकाची रब्बी हंगामात गाजराची लागवड केल्यास उच्च उत्पादनासह दर्जा व रंग चांगला मिळतो. या पिकाची वाढीसाठी 18 ते 24०C तापमान उत्कृष्ट समजले जाते. तापमान 15०C खाली व 25०C पेक्षा जास्त असले तर गाजरास फिकट रंग येतो व त्यापुढे

पुरेशी गोडी उतरत नाही. तापमान 35०C वरती गेले तर या पिकाची वाढ खुंटते व तापमान खूप कमी झाल्यास गाजराची लांबी वाढते, वजन भरत नाही व त्यास योग्य आकार मिळत नाही.

गाजर जरी रब्बी हंगामातील पीक असले तरी बाजारात बाराही महिने याची मागणी असल्याने गाजराची लागवड ही तीनही हंगामात शेतकरी करत असतात. लागवडीचे कालावधी पुढील प्रमाणे आहेत. खरीप हंगाम :- जून-जुलै, रब्बी हंगाम :- सप्टेंबर ते डिसेंबर व उन्हाळी हंगामातील लागवड 15 जानेवारी ते फेब्रुवारी अखेर करता येते. रब्बी हंगामाची लागवड थंडी सुरू होण्यापूर्वी करावी. किंवा थंडी कमी झालेवर जास्त थंडीमध्ये बियाणे उगवण क्षमता कमी राहते व उगवणीस जास्त कालावधी लागतो.

## जमिनीची निवड पेरणीपूर्वीची मशागत व रानबांधणी

गाजर हे कंदवर्गीय पिक असून याचा कंद हा जमिनीत वाढत असतो त्यासाठी जमीन ही मध्यम खोलीची भूसभुशीत, पोयटयाची, कसदार, उत्तम निचऱ्याची, सेंद्रिय कर्ब चांगला असलेली निवडावी. फार हलक्या जमिनीत सेंद्रिय खत भरपूर प्रमाणात वापरून बेडवर लागवड करता येते तसेच रब्बी व उन्हाळी हंगामात भारी काळी कसदार जमीन निवडल्यास व पाणी व्यवस्थापन योग्यरित्या केल्यास उच्च उत्पादन घेता येते. लागवडीसाठी निवडलेल्या जमिनीचा सामू ६-७ एवढा असावा.

पूर्वीचे पीक काढणीनंतर जमीन नांगरट करून कुळवाच्या 2 पाळ्या द्याव्यात. दुसऱ्या पाळी पूर्वी किंवा रोटावेटर मारणे पूर्वी जमिनीस 5 टन शेणखत जमीनीवर समप्रमाणात पसरून द्यावे तसेच पिकाला लागवडी पूर्वीचा रासायनिक खताचा हप्ता (बेसल डोस) जमिनीवर सारख्या प्रमाणात पसरवून बेड तयार करावेत. बेडची रुंदी जमिनीचा प्रकार, सिंचन करण्यासाठी ची पद्धत यावर अवलंबून असते. 3-4 फुटाचे रुंदीचे, अर्धा ते एक फूट उंचीचे बेड तयार करावेत. बेडची लांबी जमिनीचे उताराप्रमाणे ठेवावी. दोन बेडमध्ये 1 ते 1.5 फूट अंतर ठेवावे. कंद वर्गीय पिके जसे की गाजर,मुळा, बीट, हळद, आद्रक यांची लागवड बेडवर करावी. त्यामुळे पाण्याचा निचरा उत्तम रीतीने होत असल्याने मुळांशी पुरेशी हवा खेळती राहते, पिकाची वाढ चांगली होते. दोन बेडमध्ये ठेवलेल्या  जागेमधून पाणी व्यवस्थापन करता येते तसेच आंतरमशागत,फवारण्या, काढणी इ. सारखी कामे त्यामधून करता येतात.

## वाणाची निवड

गाजर या पिकाचे कृषी विद्यापीठांनी बरेचसे सरळ व संकरित वाण विकसित केलेले आहेत. पण त्यांचा वापर फारसे करत नाहीत. पुसा केशर, पुसा रुचिरा, पुसा अस्मिता, पुसा मेघाली, पुसा वृष्टी इत्यादी वाण शासकीय संस्थेने संशोधित केलेले आहेत. खाजगी बियाणे उत्पादक दर 2/3 वर्षांनी भाजीपाला पिकांमध्ये संकरित वाण विकसित करून विक्रीसाठी उपलब्ध करून देत असतात हे बियाणाचे वाण शेतकऱ्यांमध्ये वापरण्याचा कल असतो.



गाजराचे वाणाचे दोन प्रकार असतात यामध्ये लाल रंगाचे गाजर व नारंगी रंगाचे गाजर. लाल रंगाचे गाजर हे लांबीस जास्त असते यामध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते तसेच ती गोड, रसाळ व चवदार असतात. यांचा वापर ज्यूस व मिठाईसाठी केला जातो. तर नारंगी रंगाच्या गाजरामध्ये पाण्याचे प्रमाण कमी असते ही गाजरे आखूड, कमी गोड असतात. यांचा वापर सॅलाड, ग्रील साठी वापर केला जातो.

गाजरांचे वाणांचा प्रकार व वाण निवड ही शेतकऱ्यांनी तयार उत्पादन विक्रीसाठ निवडलेली बाजारपेठ, स्वतःचा अनुभव व

परिसरातील शेतकऱ्यांचे अनुभव यांची माहिती घेऊन करावी. शेतकऱ्यांमध्ये प्रचलित असलेल्या काही संकरित वाणांची माहिती खाली दिलेली आहे.

**1) चॅम्पियन (सिंजेंटा) –** गडद नारंगी रंग, हा वाण लागवडीपासून 80-90 दिवसात तयार होतो, गाजराची लांबी 15 ते 18 सेमी, असून उत्पादनक्षमता 20 ते 22 टन प्रती एकर.

**२) नं. 999 (टाकी) –** हा वाण 90 ते 100 दिवसात काढणीस तयार होतो, रंग गडद नारंगी असून लांबी 15 ते 20 सेमी व उत्पादन 20 ते 21 टन / एकर, टिकवण क्षमता चांगली, कीड रोगास सहनशील.

**३) झुबेरा (क्लाऊज) -** तयार होण्यास 100-120 दिवस लागतात, 18-20 सेमी लांबी, 18-20 टन एकर उत्पादन आकर्षक नारंगी रंग, दंडगोलाकार आकार.

**4) क्युरोडा -** न्यु क्युरोडा, किंग क्युरोडा व शिन क्युरोडा हे गाजराचे नारंगी रंगाचे वाण असून हे वाण खाजगी बियाणे उत्पादक सकाटा सिडस्, किंग सिडस् व नॉनगाऊ यांनी संशोधित केलेले आहेत. याचा कालावधी 60-80 दिवसाचा असून चवीस गोड आहेत त्याची 18-23 सेमी व 200-250 ग्रॅम वजन असते.

**5) KSP-1225 (कलश) -** तयार होण्यास 80 ते 85 दिवस लागतात, 25 ते 28 सेंमी लांबी 21-22 टन प्रति एकर उत्पादन मिळते, लाल रंग, एक सारखा आकार, मऊ गाजर.

**6) महाराणी (अँग्रो सीड्स) -** गडद लाल रंग, लांबी 30-35 सेमी, वजन 200-250 ग्रॅम, 70-75 दिवसात काढणीस तयार होतो.

**7) रोज रेड, देशी रेड, (डॉक्टर सीड्स) -** गडद लाल रंगाचे गाजर, एकसारखी वाढ होते, आकर्षक रंग, चव उत्कृष्ट, 20-25 सेमी लांबीचे गाजर, वजन 190-225 ग्रॅम, 100-110 दिवसात काढणीस तयार होणारा वाण.

## लागवडीचे पद्धत, अंतर, बियाण्याचे प्रमाण व बीज प्रक्रिया

लागवडीपूर्वी बियाणे 24 तास स्वच्छ पाण्यात भिजू घालावे व ते दुसऱ्या दिवशी लागवडीसाठी वापरावे. लागवडीच्या दिवशी सकाळी या भिजवलेल्या बियावर ट्रायकोडर्मा, स्फुरद विरघळणारे जिवाणू, पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू प्रत्येकी 5 ग्रॅम प्रमाणात घेऊन बियाण्यास लावावे व नंतर सावलीत बी वाळवून लगेच पेरणी करावी. गाजराची लागवड ही काही शेतकरी फोकून (विस्कटून) करतात परंतु ही पद्धत अत्यंत चुकीची असून यामध्ये दोन रोपातील व ओळीतील अंतर योग्य राखले जात नाही त्यामुळे उच्च दर्जाचे, एकसारखे उत्पादन मिळत नाही, आंतरमशागतीची कामे करता येत नाहीत व कीड रोगांचा प्रादुर्भाव जास्त होतो. त्यामुळे लागवडीसाठी हस्तचलित किंवा ट्रॅक्टर चलित पेरणी यंत्राव्दारेच लागवड करावी ज्यामुळे उच्च दर्जाचे उत्पादन मिळते. बदला माल जास्त निघत नाही.

गाजराची लागवड ही जमिनीचा प्रकार, निवडलेला वाण व हंगामानुसार, दोन ओळीतील व दोन रोपातील अंतर बदलते. खरीपात 45 x 15 सेमी. रब्बी (उन्हाळ्यात) 30-45 x 10-15 या अंतरावर करावी, बी जास्त खोल पडणार नाही याची दक्षता घ्यावी. संकरित वाणाचे एकरी 1.5-2 किलो बियाणे पेरणीसाठी आवश्यक असते.



## एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन

गाजर हे पीक जरी अल्पकालावधीचे म्हणजेच 90-100 दिवसात तयार होत असले तरी संकरित उच्च उत्पादन वाणासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे आवश्यक असते. या पिकाची उत्पादन क्षमता ही एकरी 15-20 टन एवढी असून त्यासाठी शेणखत, कंपोस्ट खत, मुख्य अन्नद्रव्य, दुय्यम अन्नद्रव्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा तसेच जैविक खतांचा संतुलित वापर करणे आवश्यक आहे.

या पिकासाठी बेड तयार करण्यापूर्वी 5-10 टन शेणखत, 150 किलो सिंगल सुपर फॉस्फेट (पावडर) 100-200 किलो निंबोळी पेंड ही सरळ व भर खते वापरावीत. त्यासोबत डीएपी 100 किलो + एमओपी 50 किलो किंवा 12: 32:16, 10:26:26, 24:24:0:08, 20:20:00:13 यामधून गाजर पिकाची अन्नद्रव्याचे पूर्तता करणेसाठी बेसल डोस तयार करावा. कृषी विद्यापीठांनी या पिकास 50: 25:25 नत्र, स्फुरद व पालाश खतांची शिफारस केलेली आहे, वरील संयुक्त खतामधून या मात्रेची पूर्तता करावी तसेच एकरी दहा किलो सूक्ष्म अन्नद्रव्ये ग्रेड I चा वापर करावा व त्यानंतर बेड तयार करून लागवड करावी.

पीक वाढीच्या अवस्थेनुसार पाण्यात विरघळणाऱ्या खतांचा वापर कीडनाशकांचे फवारणी सोबत करावा. त्यासाठी 19:19:19, 13:40:13, 0:52:34,0:0:50 ई. खतांचा वापर करावा, या पाण्यात विरघळणाऱ्या खतांचे प्रमाण 5 ग्रॅम प्रति लिटर पाणी वापरावे यामुळे पिकास उच्च दर्जा, रंग प्राप्त होतो व उत्पादनात भरीव वाढ होते.

## आंतर मशागत व तण नियंत्रण

पेरणी केलेल्या दिवशी पाच टक्के ऑक्सिफ्लेरेफेन 23.5% EC (गोल) एक मिली व क्विझॉलफॉस इथाईल 5% EC (टरगा सुपर) 1.5 मिली पाणी या प्रमाणात फवारल्यास सुरुवातीचे 25-30 दिवस चांगली तणांचे चांगले नियंत्रण मिळते. होते. त्यानंतर आवश्यकता असेल तर हात कोळप्याने तण काढता येते तसेच पिकास मातीची भर देता येते. तणनाशक फवारणीस उशीर झाल्यास फक्त टरगा सुपर या तणनाशकाचा वापर करावा.



## आळवण्या

गाजर पीक लागवड करतेवेळी व नंतर हंगामामध्ये एकदा वेळा ट्रायकोडर्मा व्हिरीडी, मेटारायझम ॲनोसोप्ली, पॅसिलोमायसिस आणि सुडोमोनास फ्लोरोसन्स या सूक्ष्मजीवांची आळवणी करावी यामुळे पिकावर जमिनीतून होणाऱ्या रोगांचा प्रार्दूभाव होत नाही. तसेच पीक सुद्दढ व निरोगी राहते. वरील मित्र बुरशी व जिवाणू एकरी 1 किलो प्रत्येकी याप्रमाणे प्रमाणात आळवणी करण्यात यावी. रासायनिक किटकनाशक तथा बुरशीनाशकाची जमिनीमधून आळवण्या करू नयेत.

## पाणी व्यवस्थापन

गाजर हे पीक जमिनीखाली वाढत असल्याने मुळांभोवती वायूविजन म्हणजे हवा खेळती राहणे अत्यंत आवश्यक असते त्यासाठी कायमस्वरूपी जमीन वाफशावर कशी राहील याचा विचार करून पीक वाढीची अवस्था, जमिनीचा प्रकार व तापमानाचा विचार करून पाणी व्यवस्थापन करावे. त्यासाठी ठिबक, तुषार, रेन पाईप चा वापर करून पाणी व्यवस्थापन करावे. सपाट वाफे, पाटाणे पाणी देणे या पद्धती कालबाह्य झालेले आहेत त्याचा वापर करू नये. बेडवर लागवड केल्यास दोन बेड मधील स-यावाटे पाणी देता येते. ज्यामुळे बेड संपूर्ण ओला होईल. परंतु यासाठी बेडची रुंदी व जमिनीचा उतार विचारात घ्याव्यात. सर्व बेड एक सारख्या प्रमाणात ओले होत असतील तर या पद्धतीचा अवलंब करावा.

## एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन

या पिकावर मावा, तुडतुडे, फुल किडे, पांढरी माशी, कोळी, गाजरभुंगा, सूत्र कृमीचा ई. किडींचा व मर, मूळकूज, भूरी, तांबेरा, करपा, केवडा काळीकुज व पानांवरील ठिपके या रोगांचा प्रादुर्भाव होतो. त्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन करावे.

- उन्हाळ्यात शेताची खोल नांगरट करून जमीन तापू द्यावी.
- रुंद वरंबा सरी (बेड) वर लागवड करावी.
- पेरणीपूर्वी बियाणास जैविक किडनाशक व जैविक खतांची बिजप्रक्रिया करावी.
- पिकांच्या सर्व बाजूंनी मका या सापळा पिकाची 2/3 ओळी लावाव्यात.
- प्रति एकर 20 ते 40 चिकट सापळ्यांचा रस शोषण करणाऱ्या किडींसाठी वापर करावा.
- किड नियंत्रणासाठी प्रथम जैविक बुरशीनाशकांचा, निंबोळी तेल यांचा 5 मिली प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी घ्यावी.
- प्रति एकर 8 ते 10 पक्षी थांबे लावावेत.
- नत्र युक्त खताचा अतिरिक्त वापर करू नये.
- ठिबक, तुषार, मायक्रो स्प्रिंकलर या सुधारित पध्दतीचा सिंचनासाठी वापर करावा. पाणी व्यवस्थापन योग्य रीतीने करावे. पिकात पावसाचे अथवा सिंचनाचे पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी.
- लागवडीचे अंतर, जमिनीचा प्रकार, लागवडीचा हंगाम, लागवडीसाठी निवडलेला वाण यांचा विचार करून एकरी झाडांची संख्या योग्य राखावी. कमी अंतरावर लागवड टाळावी. प्रत्येक रोपास पुरेसा सूर्यप्रकाश व खेळती हवा राहील याप्रमाणे लागवड करावी.

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जैविक किड / रोग नाशकाचा वापर पुढील प्रमाणे करावा. रस शोषण करणाऱ्या किडीसाठी व सर्व प्रकारच्या अळ्यांसाठी लेक्यानीसिलियम लेक्यानी, बिव्हेरिया बॅसिनिया, लॅक्टोबॅसिलस, नोमुरिया रिलाई व बॅसिलस सबटिलीस प्रत्येकी 5 ग्रॅम प्रति लिटर पाण्यात घेऊन पिकावर लागवडी नंतर 10/15 दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. सूक्ष्मजीव फवारणी करताना त्यासोबत रासायनिक बुरशीनाशकांचा वापर करू नये. याची फवारणी सायंकाळी करावी. तसेच 5% निंबोळी अर्काची प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नियमित फवारण्या घ्याव्यात.

ज्ञानाची शेती व्यवसायीक व आरोग्यदायी..!

नियमित पिकांचे सर्वेक्षण करावे वातावरण बदलावर लक्ष ठेवून जैविक बुरशीनाशक वापरून जर किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास सोबतचे प्रपत्रात नमूद केले प्रमाणे रासायनिक कीडनाशके शिफारशीतील मात्रेत सकाळी 9 पूर्वी अथवा सायंकाळी 4 नंतर फवारणी करावी.

## काढणी व उत्पादन

पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर काढणी करावी. काढणीच्या अगोदर पंधरा-वीस दिवस पिकांचे पाणी बंद करावे ज्यामुळे गाजरामध्ये गोडी उतरेल व पाने सुकू लागतील. काढणीच्या अगोदर संपूर्ण पाने कापून घ्यावीत. हळद काढणी यंत्रासारख्या अवजाराने अथवा छोट्या नांगराने जमीन नांगरावी व पिक उपटून स्वच्छ करून त्याची प्रतवारी करावी. नंतर प्रतवारी केलेला माल जूटच्या बॅगमध्ये भरून वजन करून बाजारात माल पाठवावा. एकाच बाजारावर विसंबून न राहता परिसरातील इतर बाजाराची रोजची गरज, दर यांची माहिती घेऊन त्या बाजारात माल पाठवावा. जेणेकरून चांगला दर मिळून या पिकांमधून उच्च उत्पन्न घेता येईल.

शेतकऱ्यांनी निवडलेले लागवडीचा हंगाम, हंगामातील वातावरण, निवडलेला वाण, केलेले पिक व्यवस्थापन यावर उत्पादन अवलंबून असते. सरासरी 15-20 टन प्रती एकर एवढे उत्पादन या पिकापासून मिळू शकते.

वरिलप्रमाणे गाजर या पिकाचे लागवडीचे नियोजन तंत्रशुध्द पध्दतीने केल्यास या अल्प कालावधीच्या पिकापासून उत्पादन खर्च कमी करत असताना उच्च उत्पादनातून चांगल आर्थिक फायदा होऊ शकतो यालाचा आपण “ज्ञानाची शेती” फायद्याची व आरोग्यदायी म्हणू शकतो.



## गाजर या पिकासाठी केंद्रिय किटकनाशक मंडळ आणि नोंदणीकृत समिती (CIBRC) व कृषि विद्यापीठ यांच्या फारश्या शिफारशी नाहीत परंतू शेतकरी खाली नमूद केलेली किडनाशके / बुरशीनाशके वापरतात.

| अ.क्र. | किड/रोगांचे नाव | किडनाशकाचे नाव क्रियाशील घटकाचे प्रमाण व गट | उत्पादकांचे नाव व ब्रँड नेम | एकरी शिफारस | PHI |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मावा, Flea beetle, मूळ्यावरील अळी, पाकोळी. | क्लोरोपायरिफॉस 20% EC | सुमिटोमो - ट्रायसेल | 400-600 | 14-21 |
| 2 | मावा, पांढरी माशी, Root Maggots, Flea beetle. | इमिडाक्लोप्रिड 17.8 SL | टाटा - कॉन्फीडॉर, | 120-200 | 7-14 |
| 3 | Flea beetles, मावा, अळ्या, नागअळ्या | स्पिनोसॅड 45% EC | कॉरटेव्हा - ट्रेसर | 20-40 | 3-7 |
| 4 | Flea beetles, मावा, Root Maggots, Leaf hoppers | बायफेंथ्रीन 10% EC | धानुका - मार्कर | 200-250 | 14-21 |
| 5 | मावा, Flea beetles, Leaf hoppers | थायोमिथोक्झाम 25% WG | सिंजेंटा - ॲक्टरा | 40-80 | 14-21 |
| 6 | मिलीबग, पांढरीमाशी, मावा, Leaf hoppers | ॲसिटामाप्रिड 20% SP | टाटा - माणिक | 80-100 | 7-14 |
| 7 | Flea beetle, मावा, Cabbage Root Maggot, Leaf hoppers | लॅम्बडा सायहॅलोथ्रीन 5% EC | सिंजेंटा - कराटे | 20-400 | 14-21 |
| 8 | मावा, Flea beetle, पांढरी माशी | ॲझिडीरॅक्टीन 3000 PPM | कोरोमंडल - अझामिक्स | 400-800 | 7-14 |
| 9 | केवडा, पानावरील ठिपके, पांढरा तांबेरा, भूरी | मॅन्कोझेब 75% WP | इंडोफिल एम - 45 - | 500 | 14 |
| 10 | भुरी, पानावरील ठिपके, ॲंथ्रकनोज, तांबेरा | कार्बनडेंझिम 50% WP | क्रिस्टल - बावीस्टीन | 200 | 7-14 |
| 11 | ॲंथ्रकनोज, केवडा, जिवाणूजन्य पानावरील ठिपके, पांढरा तांबेरा | कॉपर ऑक्सीक्लोराईड 50% WP | क्रिस्टल - ब्लूकॉपर | 500 | 7-21 |
| 12 | केवडा, ॲंथ्रकनोज भुरी, पानावरील ठिपके | ॲझॉक्सीस्ट्रॉबीन 23% SC | सिंजेंटा - अमीस्टार | 80-160 | 14-21 |
| 13 | भुरी, पानावरील ठिपके, ॲंथ्रकनोज, फळकूज | थायोफिनेट मिथाईल 41.7% SC | बायोस्टॅड - रोको | 200 | 14 |
| 14 | भुरी, पानावरील ठिपके, ॲंथ्रकनोज, तांबेरा | प्रोपिकोनॅझोल 25% EC | सिंजेंटा - टिल्ट | 100-200 | 21 |
| 15 | पानावरील ठिपके, केवडा, भुरी, तांबेरा | क्लोरोथॅलोनील 75% WP | सिंजेंटा - कवच | 400 | 14-21 |
| 16 | भुरी, ॲंथ्रकनोज, पानावरील ठिपके, तांबेरा, | टेब्युकोनॅझोल 25% EC | बायर - फॉलीक्युअर | 200 | 14-21 |
| 17 | भुरी, ॲंथ्रकनोज, तांबेरा, पानावरील ठिपके | ट्रायफ्लॉक्झीस्ट्रॉबीन 25% EC | बायर - नेटीव्हो | 80-120 | 14-21 |

फायद्याची व आरोग्यदायी..!